# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2005)

४ था मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.

दू.क्र. : २६४७५०७७/२६४७७२०९ फॅक्स : ९१–०२२–२६४७३९८०

ई–मेल : secretary@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.com

जा.क्र.मरातंशिमं/का-४०/बी-६/बी-५८/२०१४/०१९ दिनांक – १५.०१.२०१४

प्रति,
प्राचार्य / संस्थाप्रमुख,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी
संलग्न असलेल्या संस्था -

विषय – हिवाळी परीक्षेचा ( W- 2013) चा निकाल जाहीर करणेबाबत

आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने घेतलेल्या हिवाळी २०१३ च्या परीक्षांचा (W- 2013) निकाल दिनांक १५.०१.२०१४ रोजी मंडळाच्या संकेतस्थळावर घोषित करण्यात येत आहे.

संस्थांची अभ्यासक्रमनिहाय निकालपत्रके व विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका दिनांक ०५.०२.२०१४ पर्यंत विभागीय कार्यालयात उपलब्ध होतील. गुणपत्रिका दिनांक १०.०२.२०१४ रोजी संदर्भीय परिपत्रकान्वये काळजीपूर्वक तपासून विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात याव्यात.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
सचिव
म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत-

१. संचालक, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी सादर
२. उपसचिव,म.रा.तंत्र शिक्षण मंडळ वि.का. पुणे/औरंगाबाद/नागपूर तसेच प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी
३. प्रणाली विश्लेषक, का. क्र. ४३ परीक्षा विभाग, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी
४. पोर्टल मॅनेजर, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना सदर परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात यावे.

F:/Harshada/winter 2013

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2005)

४ था मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.

दू.क्र. : २६४७५०७७/२६४७७२०९ फॅक्स : ९१-०२२-२६४७३९८०

ई–मेल : secretary@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.com


जा.क्र.मरातंशिमं/का-४०/बी-६/बी-५८/२०१४/०२० दिनांक – १५.०१.२०१४

**अत्यंत महत्त्वाचे**

प्रति,

प्राचार्य / संस्थाप्रमुख,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी
संलग्न असलेल्या संस्था -

विषय :- निकाल जाहिर केल्यानंतर निकालपत्रक व गुणपत्रिका तपासून कार्यवाही करण्याबाबत.
परीक्षोत्तर कामांच्या सूचनांचे परिपत्रक

महोदय,

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या हिवाळी २०१३ च्या परीक्षांचा निकाल मंडळाच्या संकेतस्थळावर दि. १५.०१.२०१४ रोजी घोषित करण्यात येत असून त्या अनुषंगाने खालील सूचनांचे पालन करण्यात यावे.

संस्थेचे अभ्यासक्रमनिहाय निकालपत्रक संस्थेचे Login वर निकाल जाहीर होताच दाखविण्यात येईल. निकालपत्रकाबाबत काही त्रुटी असल्यास त्या Message box व्दारे विहीत कालावधीत MSBTE कडे पाठवावेत. संस्थेच्या प्रतिनिधीने निकालपत्रके घेतांना तपासून घ्यावीत व त्रुटी असल्यास त्या बद्दल लेखीपत्र विभागीय उपसचिवांना द्यावे. निकाल जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या व गुणपत्रिकांची संख्या पडताळून पहावी. गुणपत्रिका तथा निकालपत्रके पूर्ण प्राप्त झालेली आहेत की नाहीत याची शहानिशा करणे संस्थेची संपूर्ण जबाबदारी आहे. गुणपत्रिका ॲपिअर विद्यार्थ्यांप्रमाणे तथा परीक्षा विषयक नियमांप्रमाणे नसल्यास तसे तात्काळ विभागीय कार्यालयाच्या तथा मुख्य कार्यालयाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. याबाबत सातत्याने संस्थांना सूचना देण्यात आलेल्या असतानाही संस्था उचित कार्यवाही करीत नाहीत असे निदर्शनास आलेले आहे. विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका (एक किंवा एकापेक्षा अधिक ) प्राप्त झालेल्या नसतील तर तसे **दिनांक - २४ फेब्रूवारी २०१४** पर्यंत विभागीय तथा मुख्य कार्यालयास फॅक्सपत्राव्दारे कळविणे आवश्यक आहे. सदर मुदतीत संस्थांनी न कळविल्यास व त्यानंतर मागणी केल्यास दंडात्मक कार्यवाही होऊ शकते याची नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे संस्थेचे प्राप्त झालेले निकालपत्र विद्यार्थ्यांनी भरलेल्या परीक्षा अर्जाप्रमाणे आहेत याची खात्री करावी. निकालपत्रकाचीही पाने अप्राप्त आहेत असे निदर्शनास आल्यास ते उपरोक्त मुदतीतच मुख्य कार्यालयाच्या तथा विभागीय कार्यालयाच्या निदर्शनास आणावयाचे आहे. गुणपत्रिका तथा निकालपत्रकांच्या अपूर्णतेविषयक लागणारे दस्तावेज d43result@msbte.com या ईमेलवर या कार्यालयाकडे पाठवावे. सदर ईमेल पाठवितांना subject मध्ये संस्था क्रमांक टाकण्यात यावा. सदरचा निकाल मंडळाने निकाल जाहिर करण्याच्या नियमांच्या अधिन राहून जाहिर करण्यांत येत आहे.

## अ) सत्र पध्दतीच्या निकालाबाबतचे नियम -

१. सत्र पध्दतीतील इ — स्कीमचा निकाल जाहीर करण्याच्या पध्दतीबाबत या कार्यालयाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-४०/का-४५/बी-३३/२०१०/४३९ दिनांक १२.१०.२०१० चे पुनश्च बारकाईने अवलोकन करावे. शीघ्र संदर्भासाठी सदरचे परिपत्रक या सोबत जोडलेले आहे.

- सी अभ्यासक्रमाचा निकाल ज्याप्रमाणे सत्र निहाय स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येत आहे त्याचप्रमाणे इ व जी स्कीमचा निकालही सत्रनिहाय स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येत आहे. निकालाचा सत्रनिहाय स्टेटस त्या त्या सत्राच्या निकालाशीच संबंधित राहील. त्याचा मागील सत्राच्या निकालाशी संबंध राहणार नाही.
- मंडळाच्या परीक्षा नियमावलीतील नियम आर जी २ सी (अे) नुसार तृतीय तथा पाचव्या सत्रांतील प्रवेशासाठी अनुक्रमे प्रथम व व्दितीय तथा तृतीय आणि चतुर्थ सत्रांतील एकत्रित अनुत्तीर्ण विषयांची संख्या विचारात घेऊन नियम आर जी २ डी नुसार विद्यार्थ्यांची पात्रता ठरवली जाते, त्या प्रमाणेच तृतीय तथा पाचव्या सत्रांच्या प्रवेशाबाबतची कार्यवाही संस्थांनी काटेकोरपणे करणे आवश्यक आहे. या बाबत निकालपत्रकावर विद्यार्थ्याच्या मागील सत्रातील अनुत्तीर्ण विषयांची संख्या तंसेच पुढील सत्रप्रवेशासाठी पात्र होण्यास एकत्रित आवश्यक कमाल अनुत्तीर्ण विषयांची संख्या नोंदवलेली आहे त्याप्रमाणेच कार्यवाही करावी. याबाबत अत्यंत विस्तृत आणि उदाहरणासहीत सूचना उपरोक्त नमुद परिपत्रकामध्ये देण्यात आलेल्या आहेत याची प्रामुख्याने नोंद घ्यावी.

२. संस्थेमध्ये प्राप्त झालेले निकालपत्रक अभ्यासक्रमाच्या टिचींग स्कीमनुसार व मंडळाच्या निकाल जाहीर करण्याच्या नियमांना आणि उपरोक्त नमुद केलेल्या सत्र पध्दतीच्या नियमांना अनुलक्षून बारकाईने तपासून पहावे. विशेषत: ATKT आणि F (T) ची प्रकरणे मंडळाच्या नियमांप्रमाणे (सत्र पध्दती ) तपासावीत तसेच निकालाशी निगडीत इतर बाबीदेखील तपासाव्यात.

३. कॉम्प्युटर इंजि. च्या ग्रुपच्या ज्या विद्यार्थ्यांनी COB 2E/2C ते 3G सत्रास प्रवेश घेतला आहे. त्यांचे गुण Transfer करणेबाबत —

१. कॉम्प्युटर इंजि. ग्रुपच्या ज्या विद्यार्थ्यांनी स्कीम बदलून 2E/C ते 3G सत्रास प्रवेश घेतला आहे असे विद्यार्थी 2E/2C सत्राच्या इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी या विषयात उत्तीर्ण असल्यास, त्यांचे ते उत्तीर्ण मार्क ३G सत्रात इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी या विषयात transfer केले आहेत

२. जे विद्यार्थी मुलत: इ स्कीमचे आहेत मात्र त्यांनी जी स्कीममधून इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी हा अनुत्तीर्ण विषय उत्तीर्ण होतील त्या विद्यार्थ्यांचा निकाल इ स्कीममधूनच जाहिर करताना सदर विषयाचे जी स्कीममध्ये प्राप्त झालेले गुण ग्राहय मानण्यात येतील.

३. तसेच स्कीम बदल केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे 2E/2C सत्राच्या इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी विषयाच्या TW चे मार्क 3G सत्राच्या इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी विषयाच्या TW मध्ये transfer झाले आहेत.

**उदाहरणादाखल -**

- अंतिम वर्ष / सत्राचा निकाल जाहीर करण्यापूर्वीच्या सर्व अटींना विद्यार्थी पात्र असणे.
- वेळोवेळी झालेल्या अभ्यासक्रम सुधारणेनुसार सर्व आवश्यक विषयात पास होणे तसेच मिसींग व अॅडीशनल विषयात पास असणे. या बाबत संस्थांनी संस्थाबदल तथा अभ्यासक्रम बदल केलेल्या विद्यार्थ्यांबाबत विशेष छाननी करणे अपेक्षित आहे. अशी छाननी न केल्याने विद्यार्थ्यांच्या अंतिम सत्राचा निकाल जाहीर झाल्यानंतरही मागील सत्रांचे मिसींग तथा बॅकलॉग विषय विद्यार्थ्याने उत्तीर्ण केलेले नसल्याची गंभीर प्रकरणे निदर्शनास आलेली आहेत.
- विद्यार्थी DISALLOWED किंवा CPS प्रकरणामध्ये अपात्र नसणे
- ज्या विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे गुणपत्रिकेत EX दर्शविले आहे, परंतु मंडळाकडून विषयात सुट मंजूर झाल्याचे आदेश प्राप्त झालेले नाहीत अशा गुणपत्रिका देण्यांत येऊ नयेत. मंडळाकडून त्यांच्या विषयातील सुट मंजूर झाल्यानंतरच त्यांच्या गुणपत्रिका त्यांना देण्यात याव्यात याची नोंद घ्यावी.
- नियम RE-८ व नियम RE-१८ प्रमाणे अनुक्रमे श्रेणीवाढ तथा फेर परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुण त्यांनी दिलेल्या विषयाप्रमाणे आहेत. अथवा मागील परीक्षेचे गुण # लावून आलेले आहेत यांची खात्री करावी तद्नंतरच विद्यार्थ्यास गुणपत्रिका द्यावी. विषय अथवा गुणात त्रुटी असल्यास विद्यार्थ्यास निकाल देऊ नये.
- ह्या व्यतिरिक्त इतर कांही त्रुटी आढळल्यास अशा विद्यार्थ्यांचे निकाल संस्थेने देऊ नयेत. ज्या विद्यार्थ्यांचा पूर्व इतिहास चुकीचा कळविण्यांत आला आहे, अगर विहित मुदतीनंतर कळविण्यांत आला आहे. अगर ज्यांचेबाबत अद्याप काही चौकशी सुरु आहे, अशा विद्यार्थ्यांचे निकाल "+ **RHR** " (Forced RHR) असे जाहीर करण्यांत येत आहेत. सदर "+ **RHR** " ची प्रकरणे निकाली काढण्याकरीता आवश्यक ती माहिती संस्थांनी विहित मुदतीत मंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे.
- डीसअलाऊड विद्यार्थ्यांचे नावासमोर DIS असे छापून येणे आवश्यक असून विद्यार्थी अपवादात्मक परिस्थितीत परीक्षेस बसला असेल व त्याचे गुणही संस्थेच्या निकालपत्रकावर छापून आलेले असतील तर गुणांवर तात्काळ खाकी रंगाची अपारदर्शक चिकटपट्टी लावण्यात यावी.
- परीक्षा नियम आर जी ४ डी नुसार विद्यार्थी एका किंवा अनेक विषयांत टर्मवर्क मध्ये अनुत्तीर्ण असेल तर त्याने टर्मवर्क (सत्रकर्म ) समाधानकारकरित्या पूर्ण केलेले नाही असा अर्थ होतो व विद्यार्थी परीक्षेस बसण्यास अपात्र होतो. अशा Disallowed विद्यार्थ्यांकरीता संस्थांनीच आदेश निर्गमित करावयाचे आहेत. मंडळाने अशा विद्यार्थ्यांचे निकाल DIS असे जाहीर केलेले आहेत, याची नोंद घ्यावी.
- विद्यार्थ्यांना सत्रनिहाय प्रथम श्रेणीमध्ये (६० टक्के) तथा प्राविण्यश्रेणीमध्ये (७५ टक्के) एकूण गुणांच्या ०.५ टक्के इतक्या गुणांचे ग्रेस मार्कींग प्रदान करण्यात येते. निकालपत्राप्रमाणे अशा विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांवरही सदर गुणवाढ नोंदविण्यात आल्याची छाननी करुनच सदर गुणपत्रिका विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात यावी.

## ब) पूर्वइतिहास तथा पी एल एस /डब्ल्यू एफ एल एस ची तपासणी करण्याबाबत

- अंतिम वर्षाच्या / सत्राच्या विद्यार्थ्यांचा परीक्षा अर्ज सादर करतांना विद्यार्थी परीक्षा पूर्व पात्रता धारण करीत असल्याचे संस्थेच्या प्राचार्यांनी प्रमाणित केले असल्याने, त्यांच्या मागील वर्षाच्या / सत्राच्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा पूर्व इतिहास तपासलेला नाही याची आपण नोंद घ्यावी. मात्र त्याबाबत संस्थांनी पूनश्च आपल्या स्तरावर खात्री करुन घ्यावी.
- जर विद्यार्थी परीक्षा पूर्व पात्रता धारण करीत नसल्याचे निदर्शनास आल्यास संस्थेने विद्यार्थ्यास निकाल देऊ नये व मंडळास तात्काळ लेखी कळवावे. या प्रकरणी नियम आर .जी. - ४ एफ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.
- विद्यार्थ्यांच्या निकालासमोर सत्रनिहाय नोंदविण्यात आलेला प्लाय/एल एस पी तथा डब्ल्यू एफ एल वाय/ डब्ल्यू एफ एल एस असा स्टेटस संस्थांनी अत्यंत काळजीपूर्वक तपासावयाचा असून त्यामध्ये काही त्रुटी असल्यास उचित पुराव्यासहची माहिती या कार्यालयाकडे सादर करुन सदर त्रुटी निकाली काढावयाच्या आहेत.
- **क्वचित प्रकरणी विद्यार्थी मागील सत्रांत/वर्षात अनुत्तीर्ण असतानाही अंतिम वर्षाचा/सत्राचा निकाल जाहीर झाला असेल तर विद्यार्थ्याचा पूर्वइतिहास काळजीपूर्वक तपासावा. अशा प्रकरणी गुणपत्रिका/प्रमाणपत्रे वितरीत न करता मंडळाकडे तात्काळ परत करावीत.**
- **त्याचप्रमाणे गैरप्रकार अवलंबिल्याची शिक्षा संपवून या परीक्षेमध्ये ॲपिअर होणा-या विद्यार्थ्यांच्या निकालाची निकालपत्रकावर आणि गुणपत्रिकेवर छाननी करण्यात यावी. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी असल्यास गुणपत्रिका विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात येऊ नयेत.**

## क) परीक्षेमध्ये गैरप्रकार अवलंबिल्याची प्रकरणे तथा निर्दोष विद्यार्थ्यांबाबतचे निर्देश

- ज्या विद्यार्थ्यांना हिवाळी परीक्षा २०१३ मध्ये गैरप्रकार अवलंबिल्याप्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती किंवा गुणमुल्यांकन केंद्राकडून ज्या विद्यार्थ्याच्या/संस्थांच्या संभाव्य गैरप्रकाराबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या आणि ज्या प्रकरणी चौकशी पूर्ण होऊन विद्यार्थी दोषी आढळले आहेत, त्यांना स्वतंत्र परिपत्रकाव्दारे मंडळाच्या नियमाप्रमाणे शिक्षा निर्देशित करण्यात आलेल्या आहेत. संस्थांनी सदर परिपत्रक विभागीय कार्यालयांकडून स्वीकारणे आवश्यक आहे.
- ज्या विद्यार्थ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली होती मात्र त्या विद्यार्थ्यांची नावे सदर परिपत्रकांत नाहीत अथवा सदर विद्यार्थ्यांची नोंद निकालपत्रामध्ये + आर एच आर अशी ही नाही, असे विद्यार्थी निर्दोष आहेत असे मानावेत मात्र त्याबाबत मंडळाच्या मुख्य कार्यालयाकडून रितसर शहानिशा करुन घ्यावी व ते निर्दोष असतील तर त्यांचा निकाल **जाहीर होण्याबाबत** आवश्यक तो पाठपुरावा संस्थाप्रमुखांनी (प्रामुख्याने पाचव्या आणि अंतिम सत्रांच्या विद्यार्थ्यांबाबत) करावा.
- ज्या प्रकरणी चौकशी पूर्ण झालेली नाही त्या विद्यार्थ्यांचे निकाल + आर एच आर आहेत. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर मंडळाच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
- ज्या विद्यार्थ्यांचे निकाल आर एच आर तथा + आर एच आर असे आहेत त्याबाबत सदर विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती (हिस्ट्री) विशेष समिती विभागाकडे किंवा परीक्षा विभागाकडे सादर करावी. अशी आर एच आर तथा + आर एच आर प्रकरणे विहित मुदतीत निकाली निघतील याकडे विशेष अवधान द्यावे.

प्रामुख्याने पाचव्या तथा सहाव्या सत्रांतील विद्यार्थ्यांची आर एच आर तथा + आर एच आर प्रकरणे विहित कालावधीत निकाली होतील या कडे संस्थांनी विशेष अवधान द्यावयाचे आहे.

## ड) गुणपत्रिका/प्रमाणपत्रे यांतील नाव दुरुस्तीसंदर्भाने निर्देश -

- वरील वर्षाच्या / अंतिम वर्षाच्या नावात दुरुस्ती करावयाची असल्यास खालील वर्षाचे ( प्रथम / द्वितीय ) निकालात नाव बरोबर आहे किंवा नाही ह्याबद्दल विस्तृत माहिती ( उदा.-परीक्षेचे वर्ष, आसन क्रमांक इत्यादी ) पाठवावी. नावात दुरुस्तीसाठी विहित पध्दतीनुसार मेरिट लिस्ट / दहावीच्या गुणपत्रिकेची /प्रमाणपत्राची / लिव्हींग सर्टिफिकेट इत्यादीची प्रमाणित प्रत पाठवावी.) अंतिम सत्रा/वर्षापूर्वीच्या सत्रांतील/वर्षातील परीक्षेच्या गुणपत्रिकांमध्ये/ प्रमाणपत्रांमध्ये नावांत बदल करावयाचा असल्यासही आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.
- ज्या विद्यार्थ्यांच्या नावांत बदल अपेक्षित आहे त्यांना गुणपत्रिका/प्रमाणपत्र वितरीत करण्यात येवू नये. संस्थांनी अशा गुणपत्रिका / प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना वितरित केल्यास विद्यार्थ्यांच्या नाव दुरुस्तीबाबत मंडळाच्या आरजी-१३ नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
- **मंडळाच्या आर जी १३ नुसार अंतिम सत्राचा/वर्षाचा निकाल जाहीर झाल्यानंतर नावांत बदल करण्याबाबतची प्रकरणे स्वीकारली जाणार नाहीत याची संस्थांनी नोंद घ्यावी व विद्यार्थ्यांनाही या बाबत न चुकता तात्काळ अवगत करावे.**

## इ) गुणपत्रिकांमध्ये चुकीचे गुण नोंदविल्याची प्रकरणे (SW, PR, OR, TW, TM इत्यादी)

- ब-याचशा संस्था निकाल जाहीर झाल्यानंतर **SW, PR, OR, TW, TM** इत्यादी विषयांचे चुकीचे गुण परीक्षकांच्या गुणपत्रिकेत भरुन पाठविण्यांत आल्याचे कळवितात. सदर बाबी अत्यंत गंभीर व आक्षेपार्ह आहेत याची संस्थांनी नोंद घ्यावी. **अशा प्रकारची प्रकरणे आपण मंडळाच्या मुख्य कार्यालयाकडे संस्था प्रतिनीधीमार्फत पाठवावीत.** संस्था प्रमुखांनी ह्याबाबत मंडळाच्या मुख्य कार्यालयांत उपसचिव, परीक्षा विभाग ( **EXT - ४०१** ) ह्यांच्याशी दूरध्वनीवरुन प्रथम संपर्क साधावा. अशा प्रकरणी आवश्यक त्या सर्व **मूळ कागदपत्रांसह** संस्था प्रतिनीधीस मंडळाच्या मुख्य कार्यालयात उपस्थित रहावे लागेल. चुकीचे गुण का नोंदविण्यात आले याबाबत संबंधित परीक्षकांचा व प्राचार्यांचा सुस्पष्ट खुलासा सोबत जोडणे अत्यंत आवश्यक आहे.
- सतत मुल्यांकनाची (कंटीन्यूअस असेसमेंट) गुणांची प्रपत्रे संस्थेत उघडली गेली असतील, त्यांत खाडाखोड असेल व संबंधितांची त्यावर सही नसेल किंवा त्यावर इरेझर इंकचा वापर केला असेल तर अशी प्रपत्रे मंडळ स्वीकारणार नसून तशी सादरही करण्यात येऊ नयेत. तसेच या प्रकरणी संस्थेवर दंडात्मक कार्यवाही होण्याची शक्यता आहे, ह्याची नोंद घ्यावी.

**टिप-** ज्या विद्यार्थ्याच्या निकालात दुरुस्ती WFLS,WFLY, PLY, RHR व नावात दुरुस्ती इत्यादी दुरुस्ती करावयाची आहे, ह्याची माहिती Table- D-४०/C, D-४०/D मध्येच भरुन पाठवावी. हे तक्ते विभागीय कार्यालयाकडून प्राप्त करावेत. सदरचे तक्ते तथा आवश्यक ती सर्व माहिती माहितगार दूतामार्फत दिलेल्या कार्यक्रमानुसार सादर करावी. निकाल दुरुस्तीच्या कार्यक्रमासाठी सोबत जोडलेले प्रपत्र -अ पहावे.

## फ) डब्ल्यू एफ एल एस/डब्ल्यू एफ एल वाय विद्यार्थ्यांच्या निकालपत्रकातील गुणांबाबत तसेच क्लास इंप्रूव्हमेंटच्या गुणपत्रिका वितरीत करण्याबाबतचेही निर्देश -

- परीक्षेच्या निकालात **WFLY/WFLS** असणा-या विद्यार्थ्यांचे गुण छापण्यांत आलेले आहेत. सदरचे गुण फक्त माहितीसाठी असुन या गुणांवरुन विद्यार्थ्यास कोणतीही गुणपत्रिका किंवा (कोणत्याच प्रकारचे) प्रमाणपत्र देण्यांत येऊ नये. असे प्रमाणपत्र अथवा गुणपत्रिका दिलेली आढळल्यास संस्थावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची विशेष नोंद घ्यावी.
- निकालपत्रात विद्यार्थ्यांचे विषयवार गुणानंतर विद्यार्थ्यांचे मागील परीक्षेचा आसन क्रमांक, नोंदणी क्रमांक छापण्यांत आलेला आहे. या आसन क्रमांकाप्रमाणे विद्यार्थ्यांचे मागील परीक्षेमधील गुण पुढे घेण्यांत आलेले आहेत. हा क्रमांक आपण तपासून योग्य असल्याची शहानिशा करावी. ह्या आसन क्रमांकामध्ये विसंगती / त्रुटी असल्यास लेखी स्वरुपात मंडळाच्या त्वरीत निर्देशनास आणून द्यावे. अन्यथा सदरचा आसन क्रमांक व त्यावरुन घेतलेले गुण योग्य आहेत असे समजण्यांत येईल.
- श्रेणीवाढ परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे आसन क्रमांकाखाली " **I** " असा शब्द छापण्यांत आला आहे. रिॲपिंअरींगसाठी " **R** " असा शब्द छापण्यात आला आहे याची नोंद घ्यावी व त्यात काही त्रुटी असल्यास मंडळास लेखी कळवावे.
- क्लास इंप्रूव्हमेंटमध्ये सत्र पध्दतीतील कोणत्या सत्रास विद्यार्थी ॲपिअर झालेला आहे (पाचव्या किंवा सहाव्या किंवा दोन्ही एकत्रित सत्रांना) ही माहिती काही प्रकरणी संस्थांमार्फत मेन सिटींग चार्टवर अचूकपणे नोंदविण्यात येत नाही. त्यामुळे इंप्रूव्हमेंटसाठी ॲपिअर झालेल्या विद्यार्थ्यांचे निकाल संस्थेने अत्यंत काळजीपूर्वक तपासून सत्रनिहाय क्लास इंप्रूव्ह झालेला असेल तरच विद्यार्थ्यांना गुणपत्रिका प्रदान कराव्यात. ज्या प्रकरणी विद्यार्थ्याचा क्लास इंप्रूव्ह झालेला नसेल अशा विद्यार्थ्यांना नविन संधीच्या गुणपत्रिका प्रदान करण्यात येऊ नयेत व त्या स्वतंत्र प्रेषण पत्रासह (फॉरवर्डींग लेटर) या कार्यालयाकडे थेट पाठविण्यात याव्यात.
- ज्या विद्यार्थ्यांनी क्लास इंप्रूव्हमेंटकरीता दोन्ही (पाचव्या व सहाव्या) सत्रांच्या परीक्षांकरीता परवानगी घेतलेली आहे, त्या विद्यार्थ्यांच्या दोन्ही सत्रांच्या परीक्षा झाल्यानंतरच दोन्ही सत्रांच्या गुणपत्रिका क्लास इंप्रूव्हमेंट झाल्यासच विद्यार्थ्यास देण्यात याव्यात. (उदा. विद्यार्थ्याने हिवाळी परीक्षा- २०१३ मध्ये पाचव्या अथवा सहाव्या सत्राची परीक्षा दिली असेल व उन्हाळी परीक्षा २०१४ मध्ये उर्वरित दुस-या सत्राची परीक्षा देणार असेल अशा विद्यार्थ्यास उन्हाळी २०१४ च्या निकालानंतरच दोन्ही सत्रांच्या गुणपत्रिका इंप्रूव्हमेंट झालेली असल्यास प्रदान करण्यात यावी.) त्याचवेळी यापूर्वी प्रदान करण्यात आलेली मुळ गुणपत्रिका विद्यार्थ्याकडून घेऊन मंडळाकडे परत पाठविणे बंधनकारक आहे, याची प्रामुख्याने नोंद घ्यावी.
- **भविष्यात मेन सिटींग चार्टवर क्लास इंप्रूव्हमेंट बाबत पाचवे सत्र वा सहावे सत्र वा दोन्ही एकत्रित याची अचूक माहिती विभागीय कार्यालयाच्या आदेश क्रमांकाखालीच नमुद करण्यात यावी.**

## ग ) सर्वसाधारण गुणपडताळणीसाठी कार्यपध्दती -

- मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीतील नियम क्र. आर जी ९ - जे नुसार विद्यार्थ्यास आवश्यकता वाटल्यास प्राप्त गुणासंदर्भाने गुणपडताळणी करण्याची संधी देण्यात येत आहे. या अनुषंगाने सर्वसाधारण गुणपडताळणीचा कार्यक्रम निश्चित करण्यात येत असून सदर कार्यक्रमाचे वेळापत्रक यासोबत जोडण्यात आलेले आहे. सदर सर्वसाधारण गुणपडताळणीच्या कार्यक्रमाची उचित माहिती

विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणणे ही संस्थांची संपूर्ण जबाबदारी आहे. याच अनुषंगाने असेही कळविण्यात येते की, गुणपडताळणीमध्ये ज्या विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये बदल झालेला आहे असे मंडळाकडून कळविण्यात आलेले आहे अशा विद्यार्थ्यांची निकालदुरुस्ती आणि सुधारित गुणपत्रिका संस्थेने मंडळाकडून मिळवावयाची असून विहित मुदतीतच ती विद्यार्थ्यास प्रदान करण्यात यावी. **सर्वसाधारण गुणपडताळणीसाठी संस्थेमार्फत किती विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत व तशा सर्व विद्यार्थ्यांची गुणपडताळणीनंतरच्या अहवालामध्ये (बदल वा ना बदल) माहिती प्राप्त झालेली आहे की नाही याची संपूर्ण खातरजमा संस्थेने करणे बंधनकारक आहे. संस्था गुणपडताळणीनंतरच्या बदल न झालेल्या अहवालांबाबत पुरेशा गंभीर नसतात असे निदर्शनास आलेले आहे.**

- ज्या विद्यार्थ्याचे निकाल आर एच आर/प्लाय/डब्ल्यू एफ एल वाय/पी एल एस/डब्ल्यू एफ एल एस असे लागलेले असतील अथवा नाव व गुण छापले गेले नसतील अशा विद्यार्थ्यांना ह्या परीक्षेतील गुणांची सर्वसाधारण गुणपडताळणी करावयाची असल्यास अशा विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारता येतील. अशा प्रकारचा निकाल असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनीसुध्दा इतर विद्यार्थ्यासोबतच **(सर्वसाधारण) गुणपडताळणीचे अर्ज भरणे आवश्यक आहे. विलंबाने आलेले अर्ज कोणत्याही कारणास्तव मंडळाकडून स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.** विलंबाने प्राप्त झालेले अर्ज प्राचार्यांनी शिफारस करुन मंडळाकडे पाठवू नयेत.

## ह) फोटोकॉपी व पुनर्मुल्यांकनाच्या सुविधेबद्दलचे निर्देश -

- विद्यार्थ्यांना त्यांच्या विनंतीनुसार प्रति सत्र तथा वर्ष अधिकतम दोन विषयांच्या उत्तरपत्रिकांच्या फोटोकॉपी देण्याबाबत व त्याच विषयांच्याबाबत त्यांनी रिॲसेसमेंटची विनंती केल्यास तसे रिॲसेसमेंट करण्याबाबतची पध्दती मंडळाने उन्हाळी परीक्षा- २००९ पासून निश्चित केलेली आहे हे आपणांस विदितच आहे. त्याबाबतच्या निर्गमित करण्यात आलेल्या सर्व परिपत्रकांचे अत्यंत काळजीपूर्वक परिशीलन संस्थांनी करावयाचे आहे. हिवाळी परीक्षा-२०१३ साठीदेखील सदर प्रणाली राबवावयाची आहे याची नोंद घ्यावी. त्याबाबतचे वेळापत्रक या सोबत जोडण्यात आलेले असून सदर वेळापत्रकाची तंतोतंत अंमलबजावणी करावयाची आहे. फोटोकॉपी तथा पुनर्गुणमुल्यांकनाच्या वेळापत्रकाचे पालन करणे व सर्व विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकांच्या फोटोकॉपीसाठी अर्ज तथा पुनर्गुणमुल्यांनासाठीचा अर्ज ऑन लाईन पध्दतीने भरण्याच्या कालावधीची माहिती विद्यार्थ्यांना संस्थांनी देण्याबाबत विशेष दक्षता घ्यावयाची आहेत.
- सर्वसाधारण/शीघ्र गुणपडताळणी तथा उत्तरपत्रिकेच्या फोटोकॉपी - रिॲसेसमेंटबाबतचे कार्यक्रम सोबतच्या प्रपत्रांमध्ये दिलेल्या तारखांनाच सुरु करावयाचे असून निकाल जाहीर झाल्यानंतर मंडळाच्या संकेतस्थळावरुन सदर गुणपत्रिकेची प्रिंट आऊट घेऊन सदर अर्जासोबत जोडावयाची आहे याची संस्थांनी नोंद घ्यावी. त्यासंदर्भाने कोणतीही शंका/अडचणी असल्यास संस्थाप्रमुखांनी संबंधित विभागीय कार्यालयाच्या उपसचिवांशी संपर्क साधावयाचा आहे.
- उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी स्वीकारलेले विद्यार्थी रिॲसेसमेंटकरीता विहित पध्दतीने शुल्कासहीत अर्ज न करता फोटोकॉपीमध्ये त्रुटी असल्याचे कळवितात व संस्थाही अशी प्रकरणे मंडळाकडे पाठवितात. गुणमुल्यांकनामध्ये कोणत्याही स्वरुपाची तफावत वा त्रुटी विद्यार्थ्यांना आढळल्यास त्यांनी पुनर्गुणमुल्यांकनाच्या कार्यक्रमाप्रमाणेच विहित मुदतीत अर्ज करणे बंधनकारक आहे. याकरीता

फोटोकॉपी स्वीकारल्यानंतर स्वतंत्र वा साधा विनंती अर्ज विद्यार्थ्यांनी करु नये अशी सूचना विद्यार्थ्यांना देण्यात यावी व संस्थांनीही अशी प्रकरणे मंडळाकडे पाठवू नयेत. फोटोकॉपी तथा रिअॅसेसमेंटची संपूर्ण कार्यपध्दती उचितपणे पाळली जाईल याबाबत प्राचार्यांनी विशेष दक्षता घ्यावी. फोटोकॉपी तथा रिअॅसेसमेंटबाबतची वेळापत्रकामध्ये निर्देशित केलेल्या मुदतीचे पूर्ण पालन करण्यात यावे व सदर मुदत संपून गेल्यानंतर विद्यार्थ्यांनी /संस्थांनी याबाबतच्या मुदतवाढीबाबतच्या विनंत्या मंडळाकडे करु नयेत अशा स्पष्ट सूचना याव्दारे देण्यात येत आहेत.

- **ज्या विद्यार्थ्यांचे निकाल आर एच आर /प्लाय/डब्ल्यू एफ एल वाय/एल एस पी / डब्ल्यू एफ एल एस /+ आर एच आर असे नमुद करण्यात आलेले आहेत त्या विद्यार्थ्यांनीसुध्दा फोटोकॉपी तथा पुनर्गुणमुल्यांकनासाठी याच कालावधीत अर्ज करावयाचे आहेत. निकालपत्रकावरुन गुण पाहून सदर कार्यवाही विद्यार्थ्यांनी करावयाची आहे.**
- **त्याचप्रमाणे सुधारित अॅकेडमिक कॅलेंडरमध्ये निर्देशित केल्याप्रमाणे सैध्दान्तिक उन्हाळी परीक्षा- २०१४ दिनांक १० एप्रिल २०१४ पासुन सुरु होणार असल्याने व पुनर्मुल्यांकनाचे निकाल येण्यास सोबतच्या फोटोकॉपी तथा रिअॅसेसमेंटच्या वेळापत्रकाप्रमाणे आवश्यक किमान कालावधी लागणार असल्याने अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज विहित मुदतीत भरणे आवश्यक आहेच त्याचबरोबर त्या त्या अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा देणे अनिवार्य आहे.** विद्यार्थ्यांनी असे परीक्षा अर्ज भरलेले असतील व दरम्यानच्या काळात ते उत्तीर्ण असल्याची गुणपत्रिका त्यांना प्राप्त झालेली असेल तर त्या विद्यार्थ्यांनी भरलेले परीक्षा शुल्क विहित प्रक्रिया पूर्ण केल्यास त्यांना परत देण्यात येईल.
- उन्हाळी परीक्षा २०११ पासून पुनर्गुणमुल्यांकनामध्ये सदर विषयाच्या न्यूनतम (किमान) उत्तीर्ण गुणांच्या किमान १० टक्के फरकाने अधिक किंवा कमी गुणबदल होत असल्यास सदरचे गुण ग्राह्य धरण्यात येणार आहेत. या सुधारित नियमानुसार किमान उत्तीर्ण गुणांच्या १० टक्के वा अधिक गुणांतील (कमी वा अधिक) बदल ग्राह्य धरण्यात येणार असल्याने गुण वाढीबरोबरच गुण कमी होण्याची शक्यताही वाढलेली आहे. त्याचप्रमाणे या संदर्भाने मंडळाचे कार्यालयीन आदेश जा.क्र. एम एस बी टी इ/डी-४०/बी-४१/बी-२३/२०१२/०८२ दि.२१.०३.२०१२ अन्वये उत्तरपत्रिकांच्या पुनर्गुणमुल्यांकनाचा नियम सुधारण्यात आलेला आहे याची सर्व संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी. त्याप्रमाणे सदर बाबत कार्यवाही होणार आहे याची विद्यार्थ्यांना स्पष्टपणे माहिती करुन द्यावी. त्याचप्रमाणे एकदा पुनर्गुणमुल्यांकनासाठी अर्ज केल्यानंतर विद्यार्थ्यास पुनर्गुणमुल्यांकनानंतरचे गुण (कमी वा अधिक) स्वीकारणे बंधनकारक आहे याची त्यांस विशेषत्वाने जाणीव करुन द्यावी.
- असेही निदर्शनास येत आहे की, ज्या विद्यार्थ्यांचे पुनर्गुणमुल्यांकनामध्ये गुणांत वाढ होते त्यांच्या सुधारित गुणपत्रिका मिळण्याबाबत संस्था तथा विद्यार्थीदेखील पाठपुरावा करतात. मात्र ज्या विद्यार्थ्यांचे पुनर्गुणमुल्यांकनामध्ये गुण कमी होतात त्यांच्या मुळ गुणपत्रिका विद्यार्थ्यांकडून तात्काळ स्वीकारुन सुधारित (कमी गुण झालेल्या) गुणपत्रिका विद्यार्थ्यांना प्रदान करण्याबाबत पुरेशी दक्षता घेत नाहीत. संस्थांनी पुनर्गुणमुल्यांकनामध्ये गुण कमी झालेल्या विद्यार्थ्यांची स्वतंत्र यादी आपल्या स्तरावर तयार करावी व त्या विद्यार्थ्यांच्या प्रथमत: प्रदान करण्यात आलेल्या गुणपत्रिका परत मिळेपर्यंत सातत्याने पाठपुरावा करावा. जर विद्यार्थ्यांनी अशा गुणपत्रिका परत करुन सुधारित (कमी गुणांच्या) स्वीकारल्या नाहीत तर पुढील सत्राच्या परीक्षेपासून वंचित करण्यात येईल अशा प्रकारचे समजपत्र विद्यार्थ्यांना तथा पालकांना संस्थास्तरावरुन निर्गमित करण्यात यावे. विद्यार्थ्यांकडे असलेली वेगळी गुणपत्रिका आणि

मंडळाकडे त्याचे असलेले रेकॉर्ड यात संपूर्ण साम्य असणे अत्यंत आवश्यक आहे व याबाबत संस्थांनी आपल्या निकालपत्रकावरही आवश्यक निकालदुरुस्ती करुन घ्यावयाची आहे.

**ई) सी स्कीममधील अनुत्तीर्ण विषयांना इ - स्कीममधून बसलेले विद्यार्थी -**

- सी अभ्यासक्रमांतील प्रथम / व्दितीय / तृतीय / चतुर्थ / पांचवे सत्रांतील विषयांमध्ये अनुत्तीर्ण अशा ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम/ व्दितीय /तृतीय /चतुर्थ / पाचव्या सत्राच्या अभ्यासक्रमांचे १०० गुणांचे पेपर्स सोडविलेले आहेत त्यांचे गुण ८० पैकी परिवर्तीत करण्यात आलेले आहेत व ते गुणपत्रिकेत दर्शविण्यात आलेले आहेत.
- मात्र अशा विद्यार्थ्यांनी फोटोकॉपी मिळण्याबाबतची विनंती विहित पध्दतीने केलेली असल्यास त्यांच्या फोटोकॉपीवर नोंदविलेले गुण १०० पैकी असणार आहेत याची विद्यार्थ्यांना जाणीव करुन देण्यात यावी.
- अशा प्रकरणांची गुणपडताळणी करताना गुणमुल्यांकन केंद्रांनी १०० पैकी गुण ग्राह्य धरुनच गुणपडताळणी करावी व बदल ना-बदल प्रकरणे पाठवितांना विशेष दक्षता घेण्यात यावी.

**ज) उन्हाळी २०१४ परीक्षेचे एक्स विद्यार्थ्यांसाठी अर्ज -**

- सदर निकालानंतर सर्व सत्रांतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना **(X -Candidates)** उन्हाळी २०१४ साठी ऑन लाईन परीक्षा अर्ज भरण्यासंबंधाने Modified Academic Calender मध्ये नमूद केले आहे.
- ज्या विद्यार्थ्यांचे निकाल आर एच आर/ डब्ल्यू एफ एल वाय/ पी एल वाय/ एल एस पी/ डब्ल्यू एफ एल एस अशा प्रकारच्या सदरांत आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांची पूर्व माहिती (इतिहास) संस्थेतच आहे, ती पडताळून घेऊन विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असल्यास त्यांचेकडून विहित मुदतीत पुढील परिक्षेकरीता अर्ज भरुन घ्यावेत. उपरोक्त बाबींत विद्यार्थ्यांचा निकाल विलंबाने लागला म्हणून परीक्षा अर्ज स्वीकारण्याची मुदत वाढवून मिळणार नाही याची कृपया नोंद घ्यावी व याबाबतची स्पष्ट सूचना विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

  One Time Opportunity अंतर्गत ज्या विद्यार्थ्यांना पाचव्या/ सातव्या (उपान्त्य) सत्राचे सत्रकाम पूर्ण करण्याबाबत परवानगी देण्यात आलेली आहे असे विद्यार्थी सदर उपान्त्य आणि अंत्य सत्राची परीक्षा देण्यास पात्र झालेले असतील तरच त्यांना परीक्षेचा अर्ज भरण्यास परवानगी देण्यात यावी. अशा विद्यार्थ्यांना 'Regular Candidates' म्हणून अर्ज भरता येईल. मात्र अपवादात्मक प्रसंगी विद्यार्थ्यांनी आधीच अर्ज भरलेले असतील व ते पात्र नसतील तर तात्काळ त्यांची माहिती संस्थांनी निकाल प्रक्रिया युनिट कडे सादर करावी.

**ल) संस्था बदल केलेले विद्यार्थी**

ज्या विद्यार्थ्यांनी संस्थाबदल केलेला आहे, मात्र दोन्ही संस्थेत नोंदणी केली आहे. (Enrolment) त्या विद्यार्थ्यांचा एक नोंदणी क्रमांक वगळणे आवश्यक आहे. त्याकरीता संस्थाने मंडळाकडे माहिती पाठवावी. संस्थाबदल करुन ज्या संस्थेत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे त्या संस्थांनी अशा विद्यार्थ्यांची मागील हिस्ट्री उचित पध्दतीने पडताळावयाची आहे. संस्थाबदल आणि अभ्यासक्रमबदल एकाच वेळी केलेले विद्यार्थी संस्थेत असतील तर त्यांना बॅकलॉग तथा मिसिंग विषय देण्याबाबतची खातरजमा संस्थांनी करावयाची आहे.

म) **पात्रता नियम बदलल्याने उच्च सत्रांत प्रवेश घेणारे विद्यार्थी**

शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये पात्रता निकषात बदल झाल्याने प्रथम वर्षात / सत्रांत प्रवेशित काही विद्यार्थी व्दीतीय वर्षात / सत्रांत प्रवेशास पात्र ठरले आहेत व त्यांनी प्रवेश घेतले आहेत. मात्र त्या विद्यार्थ्यांचे प्रथम सत्रांतील / वर्षातील नोंदणी वगळणे आवश्यक आहे. त्याबाबतची माहिती संस्थांनी तात्काळ पाठवावी.

ख) **ॲकेडमिक कॅलेंडरचे अनुपालन -**

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ चे सुधारित शैक्षणिक वेळापत्रक (ॲकेडमिक कॅलेंडर) मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे हे आपणांस विदितच आहे. त्यानंतर **सुधारित शैक्षणिक वेळापत्रकामध्ये उन्हाळी परीक्षा २०१४ साठीच्या सर्व उपक्रमांच्या पूर्ततेचा विहित कालावधी नमुद करण्यात आलेला आहे.** या सर्व विविध उपक्रमांचे कालावधीप्रमाणे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी संस्थांची आहे. शैक्षणिक वेळापत्रकामध्ये शैक्षणिक कालावधी सुरु झाल्यानंतर कोणताही बदल संस्थांनी आपणहून करणे तथा तसे विभागीय कार्यालयास कळविणे अपेक्षित नाही. मंडळाने शैक्षणिक वेळापत्रक निर्गमित केलेले असून संस्थांनीही अंतर्गत स्तरावरील सर्व उपक्रमांचे वेळापत्रक विद्यार्थ्यासाठी सूचना फलकावर तथा प्रत्येक विभागप्रमुखांच्या दालनामध्ये लावण्यात यावे.

एकूणच, इ व जी – स्कीमच्या निकालपत्रकांची आणि गुणपत्रिकांची अचूक तपासणी, त्या अनुषंगाने उचित पध्दतीने करावयाच्या पुढील सत्रांतील प्रवेश प्रक्रिया, सर्वसाधारण गुणपडताळणी आणि फोटोकॉपी तथा पुनर्गुणमुल्यांकनाच्या कार्यक्रमांची वेळापत्रकाप्रमाणे अचूक अंमलबजावणी ह्या महत्त्वाच्या बाबींसंदर्भाने सदर परिपत्रकानुसार संस्थांनी कार्यवाही करावयाची आहे.

मंडळाच्या निकालप्रक्रियाविषयक सर्व बाबी (नोंदणी अर्ज, परीक्षा अर्ज, मेन सिटींग चार्टची संगणकीय प्रणालीवरुनच केली जाणारी तपासणी) संगणकीय प्रणालीव्दारे पूर्ण करताना त्यामध्ये अपेक्षित असणारी अचूकता ही सर्व संस्थांच्या उचित पध्दतीच्या कामावर आणि वेळोवेळी निर्गमित केल्या जाणा-या परिपत्रकांतील सूचनांचे परीशीलनपूर्ण पालन करण्यावरच अवलंबून आहे. त्यामुळे परिपत्रकांचे अचूक परिशीलन करण्यावर व त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यावर संस्थांनी अधिक भर देण्याची आवश्यकता आहे व यामध्ये संस्थाप्रमुखांनी विशेष दक्षतापूर्वक आपली जबाबदारी पार पाडावयाची आहे. मंडळाने घोषित केलेल्या कार्यक्रमानुसार निकाल दुरुस्तीसाठी येणा-या प्रतिनिधीस मंडळातर्फे द्वितीय श्रेणीचे रेल्वे अथवा बसचे भाडे वा सदर प्रतिनिधीस अनुज्ञेय असणारे प्रवास भाडे देण्यात येईल. विहित पध्दतीनुसार विभागीय कार्यालयाकडे देयके सादर करण्यांत यावीत.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई- ५१

प्रत –

१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - ४०० ०५१ यांना सादर.

F:/Harshada/winter 2013

२) उपसचिव, सी डी सी विभाग, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी

३) उपसचिव, परीक्षा विभाग, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी

४) उपसचिव, म.रा.तं.शि.मं.वि.का.पुणे/औरंगाबाद/नागपूर व प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.

५) कार्यासन अधिक्षक, का. क्र. ४३ - आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

६) पोर्टल व्यवस्थापक - संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

तक्ता क्रमांक - डी-४०/गुणपडताळणी/२०१४/०२० दिनांक १५.०१.२०१४

## हिवाळी परिक्षा -२०१३

## सर्वसाधारण गुणपडताळणी कार्यक्रम

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशील | कालावधी/दिनांक |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी ON LINE (संगणकीय प्रणालीमार्फत) अर्ज करण्याचा कालावधी | १८.०१.२०१४ ते २३.०१.२०१४ |
| २ | संस्थेने सदर अर्ज Confirm करण्याचा कालावधी. तसेच सर्व अर्ज एकत्रित यादी स्वरुपात (Consolidated Lists of all students of semesters & courses.) विभागीय कार्यालयाकडे सादर करण्याचा कालावधी | २५.०१.२०१४ |
| ३ | संस्थेने सादर केलेल्या Consolidated Lists आणि ON LINE (सॉफ्ट कॉपी) यांची छाननी करुन ते RBTE ने कन्फर्म करुन मुख्य कार्यालयाकडे अपलोड करण्याचा दिनांक | २८.०१.२०१४ |
| ४ | मुख्य कार्यालयाने प्राप्त अर्जानुसार गुणमुल्यांकन केंद्रनिहाय ॲलोकेशन करुन संबंधित गुणमुल्यांकन केंद्रांना आणि विभागीय कार्यालयांना प्रणालीव्दारे माहिती पाठविण्याचा दिनांक | २९.०१.२०१४ ते ३०.०१.२०१४ |
| ५ | गुणमुल्यांकन केंद्राने करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी | ३१.०१.२०१४ ते ०४.०२.२०१४ |
| ६ | गुणपडताळणीमध्ये बदल झालेली प्रकरणे (उत्तरपत्रिकांसहित ) संबंधित विभागीय कार्यालयाकडे यादीव्दारे सादर करण्याचा दिनांक तसेच ना बदल प्रकरणांची यादी विभागीय कार्यालयाकडे सादर करण्याचा दिनांक | ०५.०२.२०१४ |
| ७ | गुणपडताळणीच्या गुणबदल प्रकरणी विभागीय कार्यालयाने त्रिसदस्यीय समिती नेमून करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी | ०६.०२.२०१४ ते ०८.०२.२०१४ |
| ८ | त्रिसदस्यीय समितीने मंजूर केलेल्या गुणपडताळणीतील गुणबदलाची यादी विभागीय कार्यालयाने मुख्य कार्यालयाकडे अपलोड करुन यादी स्वरुपात सादर करण्याचा कालावधी | ११.०२.२०१४ |
| ९ | मुख्य कार्यालयातून गुणपडताळणीतील गुणबदलाच्या प्रकरणांचा निकाल दुरुस्तीचा कालावधी | १२.०२.२०१४ ते १७.०२.२०१४ |
| १० | मुख्य कार्यालयाकडून सुधारित गुणपत्रिका विभागीय कार्यालयाकडे पाठविण्याचा दिनांक | २०.०२.२०१४ |
| ११ | गुणपडताळणीच्या सुधारित गुणपत्रिका विभागीय कार्यालयाने संबंधित संस्थांना वितरीत करण्याचा कालावधी | २४.०२.२०१४ |

सूचना - संस्थांनी या तक्त्यातील अ.क्र. १ मधील तारखा व कार्यक्रमांबाबत सूचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे. सर्वसाधारण गुणपडताळणी कार्यक्रम वर्ष व सत्र पध्दती या दोन्हींसाठी असून कार्यक्रमाचा कालावधी विहीत पध्दतीने पार पडेल याबाबत विभागीय कार्यालयानी आणि संस्थांनी दक्षता घ्यावी.

१. फोटोकॉपीची मागणी करणा-या विद्यार्थ्यांनी त्या विषयासाठी गुणपडताळणीकरीता स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता नाही. फोटोकॉपी करण्यापूर्वी गुणपडताळणी करण्याच्या सूचना गुणमुल्यांकन केंद्रास देण्यात आल्या आहेत.

F:/Harshada/winter 2013

२. विद्यार्थ्यांनी ऑन लाईन अर्ज भरताना माहिती अत्यंत अचूक भरावयाची असून अर्ज SUBMIT केल्यानंतर संस्थेच्या लॉगीनमध्ये तो जमा झाल्याची खातरजमा विद्यार्थ्यांने करावयाची आहे.

३. विद्यार्थ्यांने प्रिंट कॉपी सह संस्थेस गुणपडताळणी अर्ज कन्फर्म करण्याची विनंती केल्यानंतर सदर प्रिंट कॉपीनुसार संस्थेने ऑन लाईन अर्जाची छाननी करावयाची असून अर्ज कन्फर्म करुन गुणपडताळणी शुल्क स्वीकारावयाचे आहे. अशा कन्फर्म केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी संस्थेने विभागीय कार्यालयाकडे सादर करावयाची आहे.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
सचिव
म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत -

१. म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, वि.का. पुणे/औरंगाबाद/नागपूर तसेच प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग - यांना कळविण्यात येते उपरोक्त कार्यक्रम सर्व संस्थांना कळवावा तसेच विहित कालावधीत पार पडेल याबाबत दक्षता घ्यावी.

२. पोर्टल मॅनेजर, म.रा.तं.शि.मं. मुंबई - सदर कार्यक्रम पत्र मंडळाच्या संकेतस्थळावर तात्काळ प्रकाशित करावे.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

तक्ता क्रमांक - मरातंशिमं/डी-४०/निकालदुरुस्ती/२०१४/०२०, दिनांक १५.०१.२०१४

## हिवाळी परीक्षा - २०१३

## RHR/WFLY

## निकाल दुरुस्तीचा कार्यक्रम

अंतिम वर्षासहीत /सत्रांसहीत उर्वरित सर्व वर्षांचा तसेच सर्व सत्रांचा निकाल **RHR** असलेली प्रकरणे,वा प्लाय प्रकरणे/डब्ल्यू एफ एल वाय प्रकरणे ही उचित तक्त्यात भरुन मंडळाच्या मुंबई कार्यालयाकडे संपूर्ण अचूक माहितीसह खालील मुदतीत पाठविण्यात यावीत. अंतिम सत्रासाठी/वर्षासाठी स्वतंत्र वेळापत्रक देण्यात येत नसले तरी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेस अनुलक्षून संस्थांनी सदर प्रकरणे (फक्त अंतिम सत्राची/वर्षाची) प्राधान्याने थेट मुख्य कार्यालयाकडे सादर करावयाची आहेत.

१ संस्थेने माहिती तक्त्यात भरुन विभागीय कार्यालयाकडे सादर करण्याचा दिनांक - **१२.०२.२०१४ ते १४.०२.२०१४**

२ विभागीय कार्यालयाने सदर माहिती व निकालपत्रके मुख्य कार्यालयाकडे पाठविण्याचा दिनांक – **१५.०२.२०१४ ते १८.०२.२०१४**

## निकाल दुरुस्तीचा प्रथम टप्पा २४.०२.२०१४ ते ०१.०३.२०१४

| विभाग | संस्था क्रमांक |
|---|---|
| १) मुंबई विभाग | संस्था क्रमांक ०००२ ते ०५२२ मधील संस्था |
| २) पुणे विभाग | संस्था क्रमांक ०००६ ते ०५२३ मधील संस्था |
| ३) नागपूर विभाग | संस्था क्रमांक ००२१ ते ०७६८ मधील संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | संस्था क्रमांक ००१६ ते ०३६६ मधील संस्था |

## निकाल दुरुस्तीचा दुसरा टप्पा ०३.०३.२०१४ ते ०७.०३.२०१४

| विभाग | संस्था क्रमांक |
|---|---|
| १) मुंबई विभाग | संस्था क्रमांक ०५२८ ते ०९९९ मधील संस्था |
| २) पुणे विभाग | संस्था क्रमांक ०५२४ ते ०८२९ मधील संस्था |
| ३) नागपूर विभाग | संस्था क्रमांक ०७६९ ते ०९४७ मधील संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | संस्था क्रमांक ०३६९ ते ०७८५ मधील संस्था |

F:/Harshada/winter 2013

## निकाल दुरुस्तीचा तिसरा टप्पा १०.०३.२०१४ ते १४.०३.२०१४

| विभाग | संस्था क्रमांक |
|---|---|
| १) मुंबई विभाग | संस्था क्रमांक १०७७ ते १४२० मधील संस्था |
| २) पुणे विभाग | संस्था क्रमांक ०८४८ ते १२११ मधील संस्था |
| ३) नागपूर विभाग | संस्था क्रमांक ०९४८ ते ११३८ मधील संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | संस्था क्रमांक ०७८६ ते ११०४ मधील संस्था |

## निकाल दुरुस्तीचा चौथा टप्पा १५.०३.२०१४ ते २१.०३.२०१४

| विभाग | संस्था क्रमांक |
|---|---|
| १) मुंबई विभाग | उर्वरीत सर्व संस्था |
| २) पुणे विभाग | उर्वरीत सर्व संस्था |
| ३) नागपूर विभाग | उर्वरीत सर्व संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | उर्वरीत सर्व संस्था |

(डॉ. विनोद म. मोहितकर)
सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

F:/Harshada/winter 2013

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

तक्ता क्रमांक - डी-४०/फोटोकॉपी-रिअॅसेसमेंट/२०१४/०२०, दिनांक १५.०१.२०१४

## हिवाळी परिक्षा – २०१३

## फोटोकॉपी तथा रिअॅसेसमेंटबाबतचा कार्यक्रम

(वर्ष व सत्र पध्दतीसाठी)

| अ.क्र. | कार्यक्रम | कालावधी/दिनांक |
|---|---|---|
| अ) | **उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी मिळण्याबाबतचा कार्यक्रम** | |
| १ | विद्यार्थ्याने फोटोकॉपीचा ON LINE पध्दतीने विनंती अर्ज सादर करण्याचा कालावधी | १८.०१.२०१४ ते २३.०१.२०१४ |
| २ | विद्यार्थ्याने ऑनं लाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट कॉपी संस्थेत सादर करावयाची असून संस्थेने त्याप्रमाणे अर्जाची छाननी करुन विहित शुल्क स्वीकारुन अर्ज अंतिमत: कन्फर्म करण्याचा कालावधी (Institute should confirm the same INSTANTLY) | २५.०१.२०१४ |
| ३ | संस्थेने सदर कन्फर्म केलेल्या विद्यार्थ्यांची दिनांकनिहाय एकत्रित यादी विभागीय कार्यालयाने शुल्कासहीत स्वीकारण्याचा कालावधी | २८.०१.२०१४ |
| ४ | प्राप्त झालेला सर्व संस्थांचा डाटा विभागीय कार्यालयाने मुख्य कार्यालयाकडे Upload करुन पाठविण्याचा दिनांक | २९.०१.२०१४ |
| ५ | मुख्य कार्यालयाने सदर माहिती गुणमुल्यांकन केंद्रनिहाय अॅलोकेशन (वर्गीकरण) करुन संबंधित गुणमुल्यांकन केंद्रांना आणि विभागीय कार्यालयांना प्रणालीव्दारे माहिती पाठविण्याचा दिनांक | ३०.०१.२०१४ |
| ६ | गुणमुल्यांकन केंदाने मंडळाच्या निर्देशांनुसार करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी | ३१.०१.२०१४ ते ०४.०२.२०१४ |
| ७ | गुणमुल्यांकन केंद्रानी कार्यवाही पूर्ण करुन पी सी डी सी कडे सर्व सिलंबद पाकिटे पाठविण्याचा कालावधी | ०६.०२.२०१४ |
| ८ | पी सी डी सी कडे प्राप्त गुणबदलाच्या प्रकरणांच्या फोटोकॉपी विभागीय कार्यालयाने त्रिसदस्यीय समिती गठीत करुन तपासण्याचा व मंडळाच्या निर्देशांप्रमाणे कार्यवाही करण्याचा कालावधी | ०७.०२.२०१४ ते ११.०२.२०१४ |
| ९ | पी सी डी सी ने प्राप्त फोटोकॉपींची पाकिटे विहित कार्यवाही करुन अन्य पी सी डी सी कडे पाठविण्याचा कालावधी<br>१) गुणबदल न झालेल्या प्रकरणांसाठी<br>२) गुणबदल झालेल्या प्रकरणांसाठी | १३.०२.२०१४ |

| | | |
|---|---|---|
| १० | गुणबदल झालेली प्रकरणे विभागीय कार्यालयाने ऑन लाईन मुख्य कार्यालयाकडे तथा संबंधित विभागीय कार्यालयांकडे पाठविण्याचा दिनांक त्याचप्रमाणे विहित आदेश इ-मेलव्दारे/स्पीडपोस्टव्दारे मुख्य कार्यालयाकडे पाठविण्याचा दिनांक | १४.०२.२०१४ ते १५.०२.२०१४ |
| ११ | पी सी डी सी ने उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी संबंधित संस्थेकडे पाठविण्याचा कालावधी<br>अ) गुणबदल न झालेल्या प्रकरणांसाठी<br>ब) गुणबदल झालेल्या प्रकरणांसाठी | १४.०२.२०१४ ते १५.०२.२०१४ |
| १२ | संस्थेने आवश्यक ती नोंद करुन संबंधित विद्यार्थ्यास /अर्जदारास फोटोकॉपी देण्याचा कालावधी<br>अ) गुणबदल न झालेल्या प्रकरणांसाठी<br>ब) गुणबदल झालेल्या प्रकरणांसाठी | १७.०२.२०१४ ते २०.०२.२०१४ |
| १३ | पी सी डी सी ने मुळ उत्तरपत्रिकांची पाकिटे संबंधित गुणमुल्यांकन केंद्राकडे विहित पध्दतीनुसार पाठविण्याचा कालावधी | १७.०२.२०१४ |
| १४ | मुख्य कार्यालयाने गुणबदल प्रकरणांच्या निकालदुरुस्तीची कार्यवाही करुन सुधारित गुणपत्रिका विभागीय कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | २०.०२.२०१४ ते २६.०२.२०१४ |
| १५ | सुधारित गुणपत्रिका मंडळाच्या मुख्य कार्यालयाकडून विभागीय कार्यालयास पाठविणे | ०३.०३.२०१४ |
| १६ | विभागीय कार्यालयांनी संस्थांना गुणपत्रिका वितरीत करण्याचा दिनांक | ०७.०३.२०१४ |

**<u>महत्त्वाची सूचना</u> - सैध्दान्तिक उन्हाळी परीक्षा- २०१४ सैध्दान्तिक दिनांक १० एप्रिल २०१४ पासून सुरु होत असल्याने व पुनर्मुल्यांकनाचे निकाल येण्यास खालीलप्रमाणे किमान आवश्यक कालावधी लागणार असल्याने अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरुन त्या त्या विषयाची परीक्षा देणे अनिवार्य आहे.**

| **ब)** | **रिॲसेसमेंट (पुनर्गुणमुल्यांकन)करण्याच्या विद्यार्थ्यांच्या विनंतीबाबतचा कार्यक्रम** | **कालावधी व दिनांक** |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्याने फोटोकॉपीनिहाय विषयांच्या रिॲसेसमेंटसाठी ऑन लाईन पध्दतीने करावयाच्या विनंती अर्जांचा कालावधी. तसेच विद्यार्थ्याने प्रिंट कॉपी संस्थेकडे सादर करावयाची असून संस्थेने त्याप्रमाणे अर्जाची अचूक छाननी करुन विहित शुल्कासह अर्ज स्वीकारण्याचा कालावधी | २०.०२.२०१४ ते २५.०२.२०१४ |
| २ | संस्थांनी ऑन लाईन पध्दतीने अर्ज विभागीय कार्यालयाकडे पाठवून विभागीय कार्यालयाने शुल्क स्वीकारुन अर्ज कन्फर्म करण्याचा कालावधी | २१.०२.२०१४ ते २८.०२.२०१४ |
| ३ | विभागीय कार्यालयाने मुख्य कार्यालयाकडे सदर माहिती व याद्या ऑन लाईन पध्दतीने पाठविण्याचा कालावधी | ०१.०३.२०१४ |

| | | |
|---|---|---|
| ४ | मुख्य कार्यालयाने सदर माहिती आर आर अे सी कडे सदर माहिती पाठविण्याचा दिनांक | ०३.०३.२०१४ |
| ५ | आर आर अे सी ने करावयाच्या पुनर्गुणमुल्यांकनाच्या कार्यवाहीचा कालावधी | ०४.०३.२०१४ ते १०.०३.२०१४ |
| ६ | आर आर अे सी मध्ये केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने त्रिसदस्यीय समितीने करावयाची छाननी व त्या अनुषंगाने निर्गमित करावयाच्या आदेशांचा कालावधी | ११.०३.२०१४ ते १६.०३.२०१४ |
| ७ | मुख्य कार्यालयाकडे पुनर्गुणमुल्यांकनाचा अहवाल स्पीड पोस्टव्दारे तथा ऑन लाईन पध्दतीनेही सादर करण्याचा कालावधी | १६.०३.२०१४ |
| ८ | पुर्नमुल्यांकनामध्ये गुणबदल प्रकरणानुसार निकाल दुरुस्ती करण्याचा कालावधी | १८.०३.२०१४ ते २१.०३.२०१४ |
| ९ | निकालदुरुस्तीनंतर सुधारित गुणपत्रिका संबंधित विभागीय कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | २७.०३.२०१४ |
| १० | संस्थेने सुधारित गुणपत्रिका विद्यार्थ्यांना देण्याचा कालावधी | ३०.०३.२०१४ |

टिप –

१. संस्थांनी उपरोक्त तक्त्यातील अ आणि ब विभागातील विद्यार्थ्यांशी संबंधित तारखा फक्त सूचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणाव्यात.

२. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी फोटोकॉपी मिळण्यासाठी अर्ज केला असला तरी परीक्षा अर्ज विहित कालावधीतच सादर करणे तथा पुनर्गुणमुल्यांकनाचा निकाल प्राप्त होण्यापूर्वी परीक्षा सुरु झाल्या असल्यास ज्या विषयांसाठी अर्ज केला आहे त्या विषयांचीही परीक्षा देणे आवश्यक आहे.

३. विद्यार्थ्यांनी ऑन लाईन अर्ज भरताना माहिती अत्यंत अचूक भरावयाची असून अर्ज SUBMIT केल्यानंतर संस्थेच्या लॉगीनमध्ये तो जमा झाल्याची खातरजमा विद्यार्थ्यांने करावयाची आहे.

४. विद्यार्थ्यांने प्रिंट कॉपी सह संस्थेस अर्ज कन्फर्म करण्याची विनंती केल्यानंतर सदर प्रिंट कॉपीनुसार संस्थेने ऑन लाईन अर्जाची छाननी करावयाची असून अर्ज कन्फर्म करुन फोटोकॉपी /गुणपडताळणी शुल्क स्वीकारावयाचे आहे.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
सचिव
म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

१. उपसचिव, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ वि.का. पुणे/औरंगाबाद/नागपूर तसेच प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग - यांना आवश्यक कार्यवाहीसाठी

२. पोर्टल मॅनेजर, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - सदर वेळापत्रक संकेतस्थळावर प्रकाशित करावे.

F:/Harshada/winter 2013